**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Websitewww.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी प्रिंटेड बेडशीट व उशीकव्हर खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष, अटी-शर्ती व माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in/tender या संकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि. 02/ ०३ /२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ११ / ०३ /२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

Bhulwale
29/2

(तुकाराम हुलवळे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

29/2 29/2

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४


## श्री साईबाबा संस्थानचे
## साईप्रसाद निवासस्थान विभागाकरिता
## प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह पुरविणेबाबत ई-निविदा

**A.** **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह पुरविणेबाबत ई-निविदा-**

**B.** **<u>ई-निविदे सोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-</u>**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावानेअदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या ३ आर्थिक वर्षांची **<u>किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. १०,००,०००/- (रू.दहा लाख) असणे अनिवार्य राहील.</u>** तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

**C.** **<u>पुरवठादाराने प्रिंटेड बेडशीट व उशी कव्हर नमुने सादर करण्याची पध्दत-</u>**

१. निविदा मंजूर झालेनंतर लेटर ऑफ इंटेंट देण्यात येईल. त्यानंतर १५ दिवसांत प्रिंटेड बेडशीट व प्रिंटेड उशी कव्हरचा ०२ सेट तसेच विविध प्रकारच्या लेटेस्ट डिझाईन करीता त्याच नमुन्यांचा अल्बम संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत मान्यतेसाठी सादर करावा. संस्थानच्या संबंधित विभागाकडून सदर प्रिंटेड बेडशीट व उशीकव्हरचा नमुना मान्य केलेनंतर सदर नमुना लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविला जाईल. सदर लॅब तपासणी रिपोर्ट प्राप्त झालेनंतर संस्थानकडून प्रिंटेड बेडशीट व उशीकव्हर पुरवठा करण्याचे कन्फर्मेशनचे लेखी पत्र/ई-मेलव्दारे कळविलेनंतरच मान्य प्रिंटेड बेडशीट व उशीकव्हरचा नमुन्याप्रमाणे पुरवठा करावा लागेल.

२. पुरवठादाराने वरील अ.नं.०१ प्रमाणे कळविलेनंतर प्रिंटेड बेडशीट व उशीकव्हर नमुन्यांसोबत त्याचा लॅब तपासणी अहवाल सादर करावा लागेल.

३. सादर करण्यात आलेल्या नमुन्यांवर आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे.

४. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

**D.** **<u>पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम -</u>**

१. खरेदी करावयाचे प्रिंटेड बेडशीट व उशीकव्हरचा तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे त्यात दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. निविदा भरताना प्रिंटेड बेडशीट वउ-शीकव्हरचे **पान.नं.९** वर नमुद केलेले टेक्निकल स्पेसिफिकेशनचा विचार करून निविदा भरावी.

२. प्रिंटेड बेडशीट व उशी कव्हरवर संस्थानचे नांव टाकून दयावे लागेल.

३. निविदा फी रक्कम रु.३,६००/- व बयाणा रक्कम रु.१८,०००/-/- मात्र <u>www.mahatenders.gov.in</u>या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. **<u>MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.</u>**

**E.** **<u>निविदाधारकांसाठी सुचना-</u>**

१. सदर निविदा दि. ०२ / ०३ /२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. ११ / ०३ /२०२४ सायं. ०५.०० वाजेपर्यंत <u>www.mahatenders.gov.in</u> या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

३. शक्य झाल्यास दि. १३ / ०३ /२०२४ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

...२...

४. शक्यतो Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमधील तक्त्यात नमूद करावेतम्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

**F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. प्रिंटेड बेडशीट -०१ व प्रिंटेड उशी कव्हर -०१ असे एक सेटसाठीचे दर मागविण्यात आले आहेत. ऑनलाईन दर भरताना निविदाधारकाने एका सेटचा (एक बेडशीट व एक उशी कव्हर) दर भरावा.

२. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत. इतर कुठलीही रक्कम वेगळी आदा केली जाणार नाही.

३. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**G. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खेरदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील.

२. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांचे कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी गरजेनुसार चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**H. बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा शिर्डी येथील भांडार/श्री साईप्रसाद निवासस्थान विभागामध्ये करावा लागेल.

**I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत साहित्यांचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम बेडशीट व उशीकव्हरचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

**J. बेडशीट उशीकव्हरचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. बेडशीट व उशीकव्हर पुरवठा हा पुरवठा आदेश दिलेनंतर शक्यतो ६० दिवसांत दिलेले स्पेसिफिकेशन व मान्य नमुन्याप्रमाणे करावा लागेल. पुरवठा केलेले प्रिंटेड बेडशीट व उशी कव्हर स्पेसिफिकेशनप्रमाणे असलेबाबत शासकिय प्रयोगशाळा / सक्षम यंत्रणा यांचेकडून गरजेप्रमाणे Random तपासणी करुन अहवाल सकारात्मक प्राप्त झाले नंतरच देयक आदा करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधी संपले नंतरही ६ महिन्यांचे आत आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा ५० टक्केपर्यंत जादा बेडशीट उशीकव्हरची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास ते मान्य दरानेच पुरविणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**K. बेडशीट व उशीकव्हर स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील स्पेसिफिकेशन,मंजूर डिझाईन व मान्य नमुन्याप्रमाणे बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बील सादर करावे.

२. ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी सर्व बेडशीट उशीकव्हरचा पुरवठा मान्य झालेल्या नमुन्याप्रमाणे,त्याच दर्जाचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा, वेगळ्या प्रकारचा अगर खराब बेडशीट उशीकव्हर स्विकारले जाणार नाहीत. असा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठा करीत असलेल्या प्रिटेड बेडशीट व उशी कव्हरची Quantity जास्त असल्यामुळे बेडशीट व उशीकव्हर स्विकारलेनंतरही बेडशीट व उशीकव्हरचा एखादा लॉट खराब आढळल्यास ते पुरवठाधारकास स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या बेडशीट उशीकव्हरची संस्थानचे संबंधित विभागाकडून गरजेनुसार केंद्रशासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या बेडशीट उशीकव्हरचे रिपोर्ट मानकांप्रमाणे नसल्यास सदर बेडशीट व उशीकव्हर बदलून द्यावे लागेल.

**M. बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या बेडशीट व उशीकव्हरचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच बीलआदा करणेत येईल. सदरपुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या बेडशीट व उशीकव्हरचेबील श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणांमुळे बील आदा करणेस विलंब झाला तरीही आपणास मालाचा पुरवठा थांबविता येणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले बेडशीट व उशीकव्हर श्री साईबाबा संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून बेडशीट उशीकव्हर खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर बेडशीट व उशीकव्हरच्या बिलातुन वसुल केली जाईल अगर संस्थानने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात येईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्याकर कपाती बिलातून करण्यात येतील.

...४...

N. **आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील मालमुदतीत पुरविलानाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या बेडशीट उशीकव्हरची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या बेडशीट उशीकव्हरची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. बेडशीट व उशीकव्हर पुरविणेचा आदेश दिलेनंतर विहीत मुदतीत पुरवठा न झाल्यास अगर दिलेल्या टेक्निकल स्पेसिफिकेशन प्रमाणे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतके बेडशीट उशीकव्हर दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या बेडशीट उशीकव्हरसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. पुरवठा आदेशातील मंजुर दराने व मान्य नमुन्याप्रमाणे बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याहीकारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने बेडशीट उशीकव्हरचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन बेडशीट उशीकव्हर खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थानने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

४. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक बेडशीट उशीकव्हर पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. निविदाधारकाने स्वत:साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे.

**O. निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

**P. सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात बेडशीट व उशीकव्हर पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या बेडशीट व उशीकव्हरच्या ५० टक्के बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने बेडशीट व उशीकव्हरचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर संबंधित पुरवठादाराबाबत संस्थान जो निर्णय घेईल तो संबंधित पुरवठादारावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधित पुरवठाराची काहीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्यासाठी कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. सदर निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

९. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

Hulwale
29.2.24

(तुकाराम हुलवळे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

## अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) ☐

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement ☐

३. पॅन कार्ड ☐

४. सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या ३ आर्थिक वर्षांची सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचेचार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र (किमान ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल रू. १०,००,०००/- असणे अनिवार्य) ☐

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------

ऑफीस- ------------------------------

दुकान- ------------------------------

निवास- ------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------

ई –मेल ------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------

२. ------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------

शाखा २. ------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------

दिनांक :- / /२०२४

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

## Technical Specificationsfor Printed BEDSHEETS

| Sr.No. | Description | Specification |
|---|---|---|
| 1 | Cotton | 100 % (सुती) |
| 2 | EPI - | 64/66 (कापडातील उभे धागे) |
| 3 | PPI | 64/66 (कापडातील आडवे धागे) |
| 4 | Warp Count | 30 S Ne (कापडात वापरलेले उभे सुत) |
| 5 | Weft Count | 30 S Ne (कापडात वापरलेले आडवे सुत) (जाळे) |
| 6 | Washing Fastness | Above 4-5 (कापड धुतल्यानंतर पडणारा फरक) |
| 7 | Light Fastness | Above 4-5 (सुर्यप्रकाशात कापडावर पडणारा फरक) |
| 8 | Weight | 430 grams/no. |

## Technical Specification for Printed PILLOWCOVERS

| Sr.No. | Description | Specification |
|---|---|---|
| 1 | Cotton | 100 % (सुती) |
| 2 | EPI - | 64/66 (कापडातील उभे धागे) |
| 3 | PPI | 64/66 (कापडातील आडवे धागे) |
| 4 | Warp Count | 30 S Ne (कापडात वापरलेले उभे सुत) |
| 5 | Weft Count | 30 S Ne (कापडात वापरलेले आडवे सुत) (जाळे) |
| 6 | Washing Fastness | Above 4-5 (कापड धुतल्यानंतर पडणारा फरक) |
| 7 | Light Fastness | Above 4-5 (सुर्यप्रकाशात कापडावर पडणारा फरक) |
| 8 | Weight | 65 grams/no. |

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– श्री साईबाबा संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागाकरिता बेडशीट उशीकव्हरसह पुरविणेबाबत ई-निविदा.**

महोदय,

मी/आम्ही खालील सही करणार कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली ई-निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या बेडशीट उशीकव्हरचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर बेडशीट उशीकव्हरचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा ५०% पर्यंत जास्त बेडशीट उशीकव्हरची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या बेडशीटउशीकव्हरचा मंजुर दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर बेडशीट उशीकव्हरच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख भरणा करु. अशी रक्कम मी भरणा न केल्यास, बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच यानंतरही सुरक्षा अनामत रक्कम पुर्ण होऊ शकली नाही, तर उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम मी पुरविलेल्या बेडशीट उशीकव्हरच्या बीलातून कपात करण्यासही माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे बेडशीट उशीकव्हर वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या ३ वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०२०-२१ | |
| २ | सन २०२१-२२ | |
| ३ | सन २०२२-२३ | |
| | एकुण | |
| | ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :- / /२०२४
ठिकाण :-